# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत )

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी) B50860 दिनांक : 09/07/2020

## परिपत्रक

**विषय : भूखंड वाटपाचे सुधारित धोरण**
**संदर्भ : परिपत्रक क्र. मऔविम/विधी व कामकाज विभाग/४०**
**दिनांक २९.०१.२००८**

महामंडळाचे परिपत्रक क्र. मऔविम/विधी व कामकाज विभाग/४० दिनांक २९.०१.२००८ मध्ये नमूद औद्योगिक क्षेत्र शेंद्रा, वाळूज, बुटीबोरी, अतिरिक्त पाताळगंगा, अति. अंबरनाथ, रांजणगांव, तळेगांव औद्योगिक क्षेत्रामध्ये सद्यःस्थितीत ९० टक्क्यापेक्षा अधिक भूखंड वाटप झालेले असून नवीन उद्योजकांना भूखंड उपलब्ध होत नसल्याने त्यांची अडचणी आणि निकड लक्षात घेऊन तसेच प्राधान्य सदराखालील वाटप केलेल्या भूखंडांसाठी उद्योजकांना भूखंडाचे हस्तांतरण करतांना आकारण्यात येणा-या १०० टक्के फरकाची अट जाचक होत असल्याने महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. २८.०१.२०२० च्या बैठकीतील ठराव क्र. ६०४२ अन्वये झालेल्या निर्णयानुसार परिपत्रक **क्र. मऔविम/विधी व कामकाज विभाग/४० दिनांक २९.०१.२००८ रद्द करण्यात येत आहे.** तसेच सदर परिपत्रकामध्ये नमूद उपरोक्त औद्योगिक क्षेत्रामध्ये प्राधान्य सदराखालील आणि अन्य भूखंड वाटपासाठी महामंडळाचे प्रचलित हस्तांतरण धोरण लागू राहील.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.

७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई